# प्रेस नोट

दि.१३.०८.२०१९

## ३५० पेक्षा अधिक सर्वसामान्य नागरिकांना लुबाडणाऱ्या बांधकाम व्यवसायीकास आर्थिक गुन्हे शाखा कक्ष २, नवी मुंबई यांचेकडुन अटक

-------------------------------------

नवी मुंबई परिसरात विविध गृहप्रकल्पात स्वस्तात घरे/प्लॉट देण्याचे आमिष दाखवून ३५०पेक्षा अधिक सर्व सामान्य नागरीकांची फसवणूक करुन त्याची रक्कम घेवून फरार झालेल्या आरोपी सचिन झेंडे यास नवी मुंबई पोलीसांनी अटक केली आहे.

याबाबत खांदेश्वर पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रं. १४८/२०१९ भा.द.वि. कलम ४२०, सह महाराष्ट मालकी हक्कांच्या सदनिका (बांधण्यास प्रोत्साहन देणे, विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमण करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ४ (१) व १३ (१) अन्वये दिनांक ०९/०७/२०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्हयातील पाहिजे आरोपी बिल्डर सचिन झेंडे वय ४२ वर्ष यास अटक केली आहे.

अम्रीत डेव्हलपर्स व निसर्ग कन्स्ट्रक्शनचा प्रोप्रायटर अरोपी सचिन जगन्नाथ झेंडे याने कामोठे, कोप्रोली, कोंडले चिंचावली ता. पनवेल अशा विविध ठिकाणी विविध गृह प्रकल्प व ओपन प्लॉट प्रकल्पाकरीता स्वस्तात घर देण्याचे आमिष दाखवुन अनेक सर्वसामन्य नागरिकाकडून बुकिंग रक्कम स्विकारुन दोन वर्षात सदनिका बांधकाम प्रकल्प पूर्ण करुन घराचा ताबा देण्याचे अश्वासन दिले होते. मात्र प्रत्यक्षात कोणताही प्रकल्प पूर्ण न करता आरोपीने बुकिंग धारकाची रक्कम घेवून त्यांना पुढील तारखेचे चेक देवून पोबारा केला होता.

आरोपी विरोधात यापूर्वी अशाच प्रकारचे फसवणूकीचे १) शिवाजी पार्क पोलीस ठाणे I गुन्हा नोंद क्र ३३३/२००९, २) खांदेश्वर पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र १७९/२०१५, ३) खांदेश्वर पोलीस ठाणे I गु नों.क्र. २०५/२०१६, ४) खांदेश्वर पोलीस ठाणे I गु नों.क्र. २११/२०१६, ५) खांदेश्वर पोलीस ठाणे I गु नों.क्र. २२८/२०१६ याप्रमाणे अनेक गुन्हे दाखल आहेत. सदर आरोपी मागिल दोन वर्षापसून मिळून येत नसल्यामुळे त्याचे विरुद्ध विविध न्यायालयात चेक बाउन्स झालेबाबत निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्ट चे कलम १३८ अंतर्गत खटल्यात अधिक प्रकरणात वॉरंट निघाले असून या व्यतिरीक्त ही अनेक प्रकरणे न्यायालयात प्रलंबित होते. तसेच सदर आरोपी विरुद्ध मा. ग्राहक मंचात देखील १८२ प्रकरणे प्रलंबित असुन सुमारे २२ प्रकरणामध्ये मा. न्यायालयाने आरोपी न्यायालयात हजर राहत नसल्याने वारंट काढले आहे. आरोपीस अटक झाल्यामुळे आता सदर सर्व प्रकरणी आरोपीस न्यायालयासमोर हजर करणे शक्य होणार आहे.

आरोपी सचिन झेंडे हा मागिल दोन वर्षापासून या सर्व प्रकरणापासून वाचण्यासाठी लपून राहत होता. आरोपी विरुद्ध मौजे चिंचवली येथे निसर्ग व्हिला फेज २ या येथे रो हाउस व ओपन प्लॉट स्वस्तात देण्याचे आमिष दाखवून अनेक सर्वसामन्य नागरिकांकडून कोटयावधी रुपये बुकिंग रक्कम घेवून प्रत्यक्षात तेथे कोणतेही बांधकाम न करता रक्कम घेवून आरोपीने पोबारा केला होता. आरोपी सचिन झेंडे यास मा. पोलीस उप आयुक्त श्री. प्रविणकुमार पाटील यांचे मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखा कक्ष २ यांनी अटक केली असून आज दिनांक १३/०८/२०१९ रोजी मा. न्यायालयासमोर रिमांड मिळणेकामी हजर केले असता त्यास दिनांक १७/०८/२०१९ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केली आहे. पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखा कक्ष २ मार्फतीने चालू आहे.

मा. पोलीस आयुक्त नवी मुंबई श्री संजयकुमार यांनी सर्व सामान्य लोकांनी कोणत्याही घरासाठी बुकिंग करण्यापूर्वी त्याबाबतची शहानिशा व खात्री करुन रक्कम गुंतविण्याचे आवाहन केले असून या आरोपीच्या निसर्ग व्हिला २ मौजे चिंचोली ता. पनवेल प्रकल्पात गुंतवणूक केलेल्या लोकांनी आर्थिक गुन्हे शाखा कक्ष २, नवी मुंबईचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री विजय वाघमारे व सपोनि जयंत राजुरकर यांचेशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

----ooo----